
बीड । रविवार
०६.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : ०७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# धनंजय मुंडेंची याचिका फेटाळली !

## कोर्टाचा निकाल करुणा मुंडे शर्मांच्या बाजूने

**मुंबई । प्रतिनिधी**

करुणा शर्मा यांच्या पोटगी प्रकरणामध्ये राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांना न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. माझगाव कोर्टाने धनंजय मुंडे यांची याचिका फेटाळली आहे. करुणा मुंडे यांना दिलासा देत न्यायालयाने त्यांची दोन लाखांची पोटगी कायम ठेवली आहे. या आधी वांद्रे येथील कुटुंब न्यायालयाने करुणा शर्मा यांना दोन लाखांची पोटगी देण्यात यावी असा निकाल दिला होता. त्या विरोधात धनंजय मुंडे यांनी सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. शनिवारी झालेल्या अंतिम सुनावणीवेळी करुणा शर्मा यांच्याकडून महत्वाची कागदपत्रे पुरावा म्हणून न्यायालयात सादर करण्यात आली. धनंजय मुंडेंच अंतिम इच्छापत्र आणि स्वीकृती पत्र या दोन महत्वाची कागदपत्रांचा पुराव्यात समावेश करण्यात आला. याच पुराव्यांच्या आधारे करुणा मुंडे यांना न्यायालयाने दिलासा दिला.



### ● करुणा शर्मांचे खळबळजनक आरोप

**करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडेंवर खळबळजनक आरोप केले आहेत. मला जो प्रेमात अडकवून लग्न करेल त्याला धनंजय मुंडे २० कोटींची ऑफर दिल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला. यात त्यांनी धनंजय मुंडेंसह घनवट, पुरुषोत्तम केंद्रे, तेजस ठक्करवर यांच्या नावांचाही उल्लेख शर्मा यांनी केला. आपल्याला मोठमोठ्या दिग्दर्शकांकडून हिरॉईनची ऑफर होती असं करुणा शर्मा म्हणाल्या. धनंजय मुंडे यांनी आपल्या बदनामीचा कट रचल्याचा दावाही करुणा शर्मा यांनी केला. हे आरोप करताना करुणा शर्मा यांना अश्रू देखील अनावर झाल्याचं पहायला मिळालं.**

### ▸माझगाव कोर्टाच्या निकालात काय म्हटलंय?

न्यायालयाने धनंजय मुंडेंची आव्हान याचिका फेटाळली.


करुणा शर्मा याच धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आला.

करुणा शर्मांना पोटगीचा कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय कायम राहणार.

▶▶ उर्वरित पान २ वर

## केंद्रीय मंत्री रक्षाताई खडसे यांच्याकडून माजलगाव मठाची प्रशंसा

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**





श्री सदुरु मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या कार्यावर आधारित वर्तमान माध्यम समुहाने प्रसिद्ध केलेल्या 'दीपस्तंभ' विशेषांकाचे केंद्रीय युवक कल्याण व क्रिडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी कौतुक केले. दरम्यान, माजलगाव मठाचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या कार्याची मंत्री रक्षाताई खडसे यांनी प्रशंसा केली.

नवी दिल्ली येथील शासकीय निवासस्थानी केंद्रीय युवक कल्याण व क्रिडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांची वर्तमान टीमने भेट घेऊन दीपस्तंभ हा गुरूपौर्णिमा विशेषांक भेट दिला. यावेळी मंत्री खडसे यांनी वर्तमान माध्यम समुहाच्या सकारात्मक पत्रकारितेची ▶▶ उर्वरित पान २ वर

## अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट भरपाई द्या: आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांत संपूर्ण जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचे व फळबागांचे आतोनात नुकसान झाले आहे आणि होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनाकडे केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात १ ते ३ एप्रिलच्या दरम्यान अवकाळी पाऊस झाला. या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात असलेल्या पिकांचे तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे आणि अद्यापही होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने अवकाळी पाऊस हे कारण नियमोचित दाखवून झालेल्या नुकसानीची तक्रार पीक विमा कंपनीच्या



'क्रॉप इन्शुरन्स' पवर करण्यासाठी तलाठी अर्थात महसूल आणि कृषी विभागाच्या यंत्रणेकडून शेतकर्यांना कळवावे. तसेच प्रशासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करावेत जेणेकरून शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, कृषी आयुक्त तसेच जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.



*बीड: दत्तात्रय दुधाळ यांना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना प्रदीप जगताप, नंदकिशोर उपरे, रावसाहेब भोसले, सुधाकर तांदळे, सतीश बहीर, राजेंद्र देशमाने, अमोल धोंगडे, रवींद्र गाडेकर आदि.*

## कोद्री - सनगाव - चनई - अंबाजोगाई रस्त्यासाठी 15 कोटींचा निधी मंजूर! आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोद्री – सनगाव – चनई – अंबाजोगाई या ग्रामीण भागातील महत्त्वाच्या रस्त्याच्या विकासासाठी केंद्रीय रस्ते निधीतून १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या



पाठपुराव्यानंतर राज्य शासनाने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक गावांना जोडणाऱ्या या रस्त्याच्या दुरुस्तीला गती मिळणार असून, नागरिकांना प्रवासासाठी अधिक सुरक्षित व सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार आहेत.

कोद्री – सनगाव – चनई – अंबाजोगाई रस्त्याची मागील काही कालावधीत अत्यंत दुरावस्था ▶▶ उर्वरित पान २

## कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारे तीन टेम्पो पकडली

### ▸४२ जनावरे, टेम्पो सह चालक पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

बीड वरून हैदराबाद कडे रात्री जनावरे भरून तीन टेम्पो घेऊन जाणार असल्याची गुप्त माहिती बीड ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. त्यावरून दि.०४/०४/२०२५ रोजी रात्री ०८.३० वा सदर घटने बाबत तात्काळ माहीती देवून नंतर पोलीस हेल्प लाईन वर कॉल केला असता ग्रामीण पोलीस ठाण्याचे सपोनि दराडे साहेब, सोबत पोह १५८० मुंडे, पोह १३८ मोराळे, पोना २१४३ सानप असे बार्शी नाका पा ठिकाणी येऊन बार्शी सोलापूर हायवे कडे जाणा–या रोडने रेल्वे पटरी वरील पुला जवळ



रात्री ०९.०० वा. दोन आयशर टेम्पो व एक ट्रक एका पाठोपाठ एक एक जात असतांना दिसले गोपनिय बात बातमी दाराने राने सांगीतलेल्या या वर्णना प्रमाणे सदर वाहनाचे वर्णन असल्याने वाहनांना थांबऊन वाहनावरील चालकास पोलीसांनी वाहनामध्ये काय आहे याबाबत विचारणा केली असता त्याने वाहनात जनावरे असल्याचे सांगीतल्याने तिन्ही वाहनाचे चालकास वाहनाचे खाली उतरवून सदर वाहनाची पोलीसांनी तपासणी केली असता वाहनामध्ये म्हशी व गाई असल्याचे दिसून आले यावरून तिन्ही वाहने पोलीस ठाणे बीड ग्रामीण या ठिकाणी आणली

▶▶ उर्वरित पान २ वर

## सामान्यांच्या सुरक्षेचं सोडा, बीडच्या चोरांनी गृहराज्यमंत्र्यांचाच मोबाईल लंपास केला

### ▸योगेश कदमांची केज पोलीस ठाण्यात तक्रार

**केज । प्रतिनिधी**

राज्य गृहमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल गहाळ झाल्याची माहिती समोर येत आहे. योगेश कदम हे काल बीडच्या दौऱ्यावर होते. मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची त्यांनी सांत्वनपर भेट घेतली. राज्य गृहमंत्री योगेश कदम यांचा मोबाईल चक्क माध्यमांच्या कॅमेऱ्यासमोर गहाळ झाला आहे. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. बीडमध्ये गृहराज्यमंत्र्यांचाच मोबाईल गहाळ झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

योगेश कदम हे काल बीड दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यादरम्यान त्यांचा मोबाईल गायब झाला. शुक्रवारी योगेश कदम यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## हॉस्पिटलची बिलं अन् ६० रूपयांची गोळी ६ हजारांना; मंगेशकर रुग्णालय प्रकरणी सुरेश धस संतापले



**बीड । प्रतिनिधी**

विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्विय सहाय्यक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा भिसे यांचा पैशांअभावी उपचार केले नसल्याचा आरोप भिसे कुटुंबियांनी दिनानाथ रूग्णालय प्रशासनावर केला होता. त्यानंतर मोठा राडा पाहण्यास मिळाला. यानंतर आता या प्रकरणावर भाजप आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**काय म्हणाले सुरेश धस?**

हॉस्पिटलची बिल प्रमाणाच्या बाहेर आकारली जात आहेत. हा मुद्दा मी गेल्या काही दिवसांपूर्वीच सभागृहात उपस्थित केला होता. त्यानंतर आता आमच्याच पक्षाचे आमदार अमित गोरखे यांच्या पीएच्या बाबतीत ही घटना घडल्यानंतर हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. मात्र आता स्वत: मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात दखल घेतली आहे.

त्यावर पुढच्या ४–५ दिवसांत स्वतंत्र समिती नेमून सर्व रूग्णालयांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच मी मेडीकलचा मुद्दा दाखील उपस्थित केला होता. कारण ६० रूपयांची गोळी जर ६ हजारांना मिळत असेल तर गरिब लोकांनी आजारी पडावं की, नाही. आमचे योगेश सागर नावाचे आमदार आहेत. त्यांचे ३–४ हॉस्पिटल ▶▶ उर्वरित पान २ वर








# सर्वगुणसंपन्न 'प्रभू श्रीराम'

जगभरातील कोट्यवधी हिंदूंचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांची जयंती अर्थात श्रीरामनवमी म्हणजे रामभक्तांसाठी आनंदाची पर्वणी असते. जगाच्या पाठीवर रामराज्य हे सर्वार्थाने आदर्श असण्याचे गुपित श्रीरामांमध्ये असलेल्याला अगणित गुणांमध्ये आहे. आज या लेखातून आपण श्रीरामांची काही गुणवैशिष्ट्ये जाणून घेणार आहोत. उपास्य देवतेसंदर्भात उपयुक्त माहिती मिळाल्यावर त्या देवतेप्रती श्रद्धा वाढण्यास साहाय्य होते. आपलीही श्रीरामांप्रतीची श्रद्धा वाढीस लागून श्रीरामाच्या अस्तित्वाचा आपल्या सर्वांना लाभ व्हावा ही श्रीरामप्रभुंच्या चरणी प्रार्थना !

१. आदर्श राजा : सीतामाता, श्रीलक्ष्मण यांसह श्रीराम वनवासातून अयोध्येत परतल्यानंतर एका परिटाने सीतामातेविषयी संशय व्यक्त केला तेव्हा श्रीरामांनी प्रजेच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम नको म्हणून तात्काळ सीतामातेचा त्याग केला. ज्या अर्धांगिनीने श्रीरामांना वनवासात साथ दिली तिचा एका परिटाच्या संशयावरून त्याग करताना श्रीरामांनी एका राजासाठी प्रजा किती महत्वाची असते हे स्वतःच्या वर्तणुकीतून दाखवून दिले. श्रीरामाने राजधर्माचे पालन केले नाही असा चुकीचा संदेश येणाऱ्या पिढीकडे जाता कामा नये यासाठी श्रीरामाने आपल्या सहचारिणीचाही त्याग केला. जनतेच्या पैशांतून आपल्या सात पिढ्या बसून खातील एवढी माया गोळा करणारे हल्लीचे राजकारणी कुठे आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी प्रसंगी धर्मपत्नीचाही त्याग करणारे प्रभू श्रीराम कुठे.

२. शत्रुवरही प्रेम करणारा : रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामाने रावणाचा बंधू विभीषणाला त्याचा अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. तेव्हा विभीषणाने त्यास नकार दिला. 'मरणांती वैराणी' या वचनानुसार मृत्यूंनंतर वैरही संपते त्यामुळे तू जर रावणाचा अंत्यसंस्कार करायला तयार नसशील तर मी करतो, माझाही तो बंधूच होता असे प्रभू श्रीरामचंद्रानी विभीषणला निक्षून सांगितले. अखेर विभीषण श्रीरामांच्या सांगण्यावरून रावणाचा अंत्यसंस्कार करण्यास तयार झाला. रावण महादेवाचा थोर भक्त होता. भक्तीच्या बळावर त्याने प्रचंड बळ आणि सिद्धी हस्तगत केल्या होत्या ज्याचा त्याला गर्व झाला होता. श्रीरामांनी रावणाचा वध करून केवळ त्याची भूलोकीची यात्रा संपवली नाही, तर त्याचे गर्वहरण करून त्याचा कायमचा उद्धारही केला.

३. आदर्श पुत्र : श्रीराम सर्वार्थाने आदर्श पुत्र होते. प्रभू श्रीरामाच्या राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असतानाच सावत्र आई कैकयीने जेव्हा श्रीरामांच्या वनवासाच्या हट्ट धरला तेव्हा कोणतेही आढेवेढे न घेता श्रीरामांनी वनवासात जाण्यास तत्परतेने होकार दिला. वल्कले परिधान केली आणि वनवासात जाण्यासाठी सिद्ध झाले. वनवासाहून आल्यानंतर श्रीरामांनी कैकयी मातेचे आशीर्वाद घेतले. कोणताही पूर्वग्रह न बाळगता ते कैकयी मातेशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने वागू लागले. कुठे सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या रक्ताच्या नातेवाईकांशी वैराने वागणारे हल्लीचे राज्यकर्ते आणि कुठे वडिलांनी सावत्र आईला दिलेल्या वचनाच्या पूर्ततेसाठी क्षणार्धात साऱ्या वैभवावर पाणी सोडणारे प्रभू श्रीराम !

४. आदर्श बंधू : आजही दोन भावांत प्रेमाचे नाते दिसले कि त्यांना आपण राम लक्ष्मणाची जोडी म्हणून संबोधतो. यावरून श्रीराम आणि लक्ष्मण यांमध्ये किती प्रेमाचे नाते होते हे लक्षात येते. वनवास श्रीरामांना देण्यात आला होता मात्र लक्ष्मणाने सारे वैभव सोडून श्रीरामांची साथ दिली. श्रीरामांनीही संपूर्ण वनवासकाळात लक्ष्मणाची सर्वार्थाने काळजी घेतली. बंधू वनवासात गेला असताना अयोध्येचे राज्य उपभोगायची संधी मिळाल्यावरही भरताने श्रीरामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून विश्वस्त म्हणून राज्याचा कार्यभार सांभाळला. यावरूनच श्रीरामांनी भरताला काय ताकदीचे बंधुप्रेम दिले होते याची कल्पना येते. ज्या काळात रावणाने बंधू विभीषणाला सापत्न वागणूक दिली. वालीने बंधू सुग्रीवावर अन्याय केला होता त्याकाळात आदर्श बंधूप्रेमाचा परिपाठ श्रीरामांनी घालून दिला. वडिलांच्या संपत्तीमध्ये अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी एकमेकांचा जीव घेण्यास उठणाऱ्या आताच्या बंधूंनी श्रीराम लक्ष्मणाच्या नात्यातून बोध घ्यायला हवा.

५. संघटन कुशलता : रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर श्रीविष्णूचा अवतार असलेले श्रीराम रावणाला सहजपणे पराभूत करून सीतेला घेऊन येऊ शकले असते. एका हाताने शिवधनुष्य पेलणाऱ्या श्रीरामाचे सामर्थ्य काय होते याची कल्पना रावणालाही होती. अयोध्येहून सैन्य मागवून रावणावर चाल करूनही श्रीराम जाऊ शकले असते; मात्र त्यांनी तसे न करता वानरसेनेला संघटित करून त्यांची मने जिंकली आणि असुरी शक्तीविरोधात लढण्यासाठी मोठी फौज सिद्ध केली. वालीचा वध करून सुग्रीवाला जवळ केले. यावरून श्रीरामांमधील संघटनकौशल्य लक्षात येते.

६. एकपत्नीव्रत : ज्या काळात राजे आणि राजपुत्र अनेक विवाह करत त्या काळातही प्रभू श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. अश्वमेध यज्ञाच्या प्रसंगी पत्नीची आवश्यकता असताना प्रभू श्रीरामांनी दुसरा विवाह न करता सीतामातेची प्रतिकृती बनवून ती पत्नी म्हणून सोबत बसवली. पत्नीप्रती त्यांची निष्ठा या एका उदाहरणावरून लक्षात येते.

७. त्याग आणि साधेपणा : सावत्र माता कैकयीच्या वचनाचा आदर ठेवून त्यांनी एका क्षणात साऱ्या राजसुखाचा त्याग करून वल्कले परिधान केली. वनवासात काट्याकुट्यातून अनवाणी चालले. झोपडीत राहून कंदमुळे खाल्ली, जमिनीवर झोपले. जंगलातील वानरांना आणि अस्वलांना त्यांनी प्रेमाने जवळ केले, शबरीची उष्टी बोरे खाल्ली. यातून श्रीरामांतील त्यागाची आणि साधेपणाची जाणीव प्रकर्षाने होते. हल्लीचे राजकारणी निवडणूका आल्या की छायाचित्रे काढण्यापुरते गरिबांच्या झोपड्यांत जाऊन जेवतात(हे जेवणही फाईव्हस्टार हॉटेलमधून मागवलेले असते) कुठे अंगीभूत साधेपणा असलेले प्रभू श्रीराम आणि कुठे साधेपणाचा आव आणणारी आताची राजकीय मंडळी.

पुत्रवियोग सहन न झाल्याने राजा दशरथांनी प्राणत्याग केला. ही बातमी प्रभू रामचंद्रांना कळताच त्यांनी पितृवियोग न करता त्यांच्या पुढील गतीसाठी श्राद्धकर्म केले. यातून त्यांनी धार्मिक विधींचे महत्व अधोरेखित केले आहे. सीताहरण झाल्यानंतर सीतेच्या वियोगाने दुःखी झालेल्या श्रीरामांनी झाडांना कवटाळल्याचे संदर्भ आढळतात; मात्र भविष्याचेही ज्ञान असलेल्या श्रीरामांचा हा वियोग केवळ दाखवण्यापुरता होता. झाडांना मिठी मारून श्रीरामाने अनेक शापित जीवांना जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून कायमचे मुक्त केले. शबरीची भेट घेऊन आणि तिने दिलेली उष्टी बोरे खाऊन शबरीचाही उद्धार केला. अशी एक ना अनेक गुणवैशिष्ट्ये रामायणाच्या वाचनातून लक्षात येतात. यंदाच्या श्रीरामनवमीच्या पावनदिनी आपल्यातही श्रीरामांसारखे गुण यावेत यासाठी प्रभू श्रीरामांच्याच चरणी शरणागत होऊन प्रार्थना करूया !

– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

## पान १ वरून पुढे...

### धनंजय मुंडेंची....

धनंजय मुंडेंना करुणा शर्मा यांना दोन लाखांची पोटगी द्यावी लागणार.

करुणा शर्मा मुंडे यांनी न्यायालयात लग्नासंदर्भातलं धनंजय मुंडे यांचं स्वीकृतीपत्रही सादर केलं. या पत्रात धनंजय मुंडे यांनी ९ जानेवारी १९९८ रोजी वैदिक पद्धतीने करुणा यांच्याशी लग्न केल्याचा उल्लेख आहे. तसंच आई-वडिलांच्या दबावाखाली येऊन राजश्री यांच्यासोबत दुसरं लग्न केल्याचाही उल्लेख पाहायला मिळतोय. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी मात्र हे स्वीकृतीपत्र खोटं असल्याचं म्हणत सर्व दावे फेटाळले.

#### करुणा मुंडे यांनी कोर्टात सादर केले लग्नासंदर्भातले स्वीकृतीपत्र

– धनंजय मुंडे यांचे स्वत:चे स्वीकृतीपत्र असल्याचे सांगत करुणा मुंडे यांनी कोर्टात ते सादर केलं.

– स्वीकृतिपत्रात करुणा मुंडेंशी धनंजय मुंडे यांनी ९ जानेवारी १९९८ रोजी वैदिक पद्धतीने लग्न केल्याचा उल्लेख

– आई-वडिलांच्या दबावाखाली येऊन मी दुसरे लग्न केले, पण करुणा मुंडेंसोबत घटस्फोट घेणार नाही असाही उल्लेख.

– मी करुणा मुंडे आणि माझ्या दोन्ही मुलांसोबत राहणार असल्याचा स्वीकृतिपत्रात उल्लेख.

– हे स्वीकृतीपत्र खोटे असल्याचा धनंजय मुंडे यांच्या वकिलांचा कोर्टात दावा.

### केंद्रीय मंत्री रक्षाताई...

दखल घेत आजमितीला समाजात घडणार्या सकारात्मक घटनांचे प्रतिबिंब माध्यमांमध्ये उमटले पाहिजे. तो वसा आणि वारसा प्रामाणिकपणे जपण्याचा प्रयत्न संपादक भगीरथ तोडकरी आणि त्यांची टीम करत आहे, हे कौतुकास्पद आहे. दरम्यान, वर्तमान माध्यम समूह वेगवेगळे दर्जे दार विशेषांक प्रसिद्ध करून समाजात नवा आदर्श पायंडा पाडत आहे. त्याचीच पावती म्हणून माजलगाव मठाचे मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या कार्यावर आधारित दीपस्तंभ गुरूपौर्णिमा विशेषांक वाखाणण्याजोगा आहे. मठाचे धार्मिक आणि सामाजिक कार्य यातून माहिती झाले. एकदंरीत श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे कार्य महाराष्ट्राच्या पटलावर आले, असेही मंत्री रक्षाताई खडसे म्हणाल्या.

### कोद्री - सनगाव - चनई...

झाली होती. रस्त्यांवर जागोजागी खड्डे झाले होते. खड्ड्यांमुळे वाढलेली वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या घटना यामुळे स्थानिक नागरिकांना आणि वाहनधारकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या मार्गावरून दररोज शेकडो वाहने ये-जा करत असून, हा मार्ग शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे या रस्त्याच्या सुधारण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने पाठपुरावा केला. राज्य शासन तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदने देण्यात आली होती. शेवटी त्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले आणि केंद्रीय रस्ते निधीतून १५ कोटी रुपयांचा मंजूर करण्यात आला. यातून अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेला आडस फाटा येथील संत ज्ञानेश्वर माउली चौक ते चनई फाटा हा तीन किमीचा मार्ग देखील चौपदरी, शंभर फुटांचा होणार आहे. तसेच, स्वाराती रुग्णालय परिसरातील बसवेश्वर चौक येथून आडस रोडच्या चौपदरीला जोडणारा मार्गही होणार आहे. हा रोड छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या वाहतुकीस व स्वाराती रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी उपयुक्त ठरणार आहे. लवकरच याची निविदा प्रक्रिया राबवली जाणार असून, कामाचा प्रारंभ करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाणार आहे. त्यामुळे लवकरच या मार्गावरील नागरिकांचा प्रवास सुरक्षित आणि वेगवान होईल. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे महाराष्ट्र कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### सामान्यांच्या सुरक्षेचं...

मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची सांत्वनासाठी भेट घेतली. या भेटीत माध्यमांचे कॅमेरे उपस्थित होते. यावेळी योगेश कदम यांचा मोबाईल अचानक गायब झाला. योगेश कदम यांचा मोबाईल गायब झाल्याचे माहिती मिळताच एकच खळबळ उडाली आहे.

केज पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार

योगेश कदम यांचा मोबाईल गहाळ झाल्याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, राज्याच्या गृहमंत्र्यांचा मोबाईलच सुरक्षित नसेल, तर सर्वसामान्य जनतेच्या सुरक्षेची हमी कशी मिळणार? असा सवाल उपस्थित करत विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला आहे.

योगेश कदमांच्या कार्यालयाचं स्पष्टीकरण

दरम्यान, या प्रकरणावर आता राज्य गृहमंत्री योगेश कदम यांच्या कार्यालयाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. योगेश कदम यांचा मोबाईल हरवलेला नाही. त्यांच्यासोबत असलेल्या व्यक्तीचा मोबाईल हरवल्याची माहिती योगेश कदम यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

### कत्तलीसाठी जनावरे...

असता १) अशोक लिलंड टेम्पो क्र. चक-०४-घक्र-४३५६ मध्ये १० म्हशी व ०७ रेडया किंमत अंदाजे ४,७०,०००/- रू २) आयशर टेम्पो क्र.चक-४३-ध-२९७३ मध्ये ११ म्हशी अंदाजे ४,५०,०००/- रू ३) अशोक लिलंड ट्रक क्र.चक-१६-उउ-२९२९ मध्ये ०८ म्हशी, ०२ रेडया, ०२ गाई ई काळया किमत व तांबड्या रंगाची व ०२ वासरे किंमत अंदाजे ४.६०,०००/-रू अशा गायी व म्हशी हया वाहनामध्ये जन जनावरांचे कोणतेही डॉक्टराचे प्रमाणपत्राशिवाय अत्यंत निर्दयतेने दोरीने मानेला घट्ट बांधून कुठल्याही चा-या पाण्याची सोय न करता वाहनात पुरेशी जागा न ठेवता,कोंबून ठेवले होते. विनापरवाना वाहतूक करीत असतांना दिसून आले म्हणन तिन्ही वाहनाचे चालकास त्यांचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव १) सलमान खान फलातुल्ला पठाण वय-३० वर्षे धंदा-चालक रा. बंगला मश्जीद समोर नेवासा ता. नेवासा जि. अहिल्यानगर २) भागवत बाबूराव पवार वय-५२ वर्षे धंदा-चालक रा.धारूर ता.धारूर जि.बीड ३) नामदेव भाऊसाहेब जरे वय ४५ वर्षे धंदा-चालक रा. झापवाडी ता. नेवासा जि. अहिल्यानगर असे असल्याचे त्यांनी सांगीतले त्यांना सदर जनावरे वाहतूकीचे परवाण्या बाबत विचारना केली असता त्याचे कडे जनावरे वाहतूकीचा परवाना नसल्या बाबत त्यांनी सांगीतले व जनावरांचे वैदयकीय प्रमाणपत्र त्यांचे जवळ नसल्याचे त्यांनी सांगीतले.

क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात गाई, म्हशी, रेडया, वासरे बसवले असून सदर गाई व म्हशीचे कोणतेही डॉक्टराचे प्रमाणपत्राशिवाय व दाखल्या शिवाय अत्यंत निर्दयतेने दोरीने मानेला घट्ट बांधून कुठल्याही चा-या पाण्याची सोई न करता वाहनात पुरेशी जागा न ठेवता विनापरवाना वाहतूक करीत असतांना मिळूण आले म्हणून माझी यातील आरोपी नामे १) सलमान खान फलाचुल्ला पठाण वय-३० वर्षे धंदा-चालक रा. बंगला मश्जीद समोर नेवासा ता. नेवासा जि. अहिल्यानगर २) भागवत बाबूराव पवार वय-४-५२ वर्षे धंदा-चालक रा.धारूर ता.धारूर जि. बीड ३) नामदेव भाऊसाहेब जरे वय-४५ वर्षे धंदा-चालक रा.झाप पवाडी ता. नेवासा जि. अहिल्यानगर यांचे विरूध्द प्राण्यास छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ (१).११ (१) (ग) आ आणि प्राण्यांचे परीवहन नियम १९७८ चे कलम ४७.४८.४९ महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ कलम ११९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात नागरिक जमा झाले होते.

### हॉस्पिटलची बिलं...

आहेत. त्यांना हे सांगितलं होतं की, रूग्णापर्यंत जाईपर्यंत ६० रूपयांची गोळी ६ हजारांना मिळते. तसेच रूग्णालयांच्या नातेवाईतकांचेच मेडीकल कसे काय असतात. हा मुद्दा देखील उपस्थित केला होता. तसेच ठराविक डॉक्टर ठराविक कंपन्यांचेच मेडिसिन्स का प्रेफर करता हावर देखील या समितीने उहापोह करावा.

तसेच दीड लाखांचा दवाखाना आणि पावणे दोन लाखांचे मेडिकल बिल होते. हा प्रकार फार भयावह आहे. याचा तपास तसेच हे रूग्णालये मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे फोन का उचलत नाहीत? यांची एवढी मुजोरी कशी याचा तपास केला जावा. तसेच मी देखील या कक्षात काम पाहतो. माझ्यासह इतर मतदारसंघात मी या कक्षातून मदत पुरवण्याचा प्रयत्न करतो. मात्र जेव्हा ५ डॉक्टरांना फोन केला जातो. तेव्हा एक जण हो म्हणतो. त्यामुळे आमचा देखईल अवमानच होतो. मात्र कालची घटना आमच्याच आमदाराच्या पीएच्या बाबातील घडणं हे भयावह आहे. असंही यावेळी धस म्हणाले.

### बीड जिल्हा बँकेचे...

बँकेत अडकले आहेत. त्यामुळे त्यांचा आर्थिक व्यवहार देखील ठप्प झाल्याने येथील ग्राहकांच्या कुटुंबांवर देखील याचा विपरित असा परिणाम झाला आहे. यामुळेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या बँकेचे पालकत्व स्विकारुन ही बँक आर्थिक तोट्यातून बाहेर काढावी. जेणेकरून त्याचा फायदा जिल्ह्यातील लाखो ग्राहक तसेच शेतकऱ्यांना होणार असल्याचे राजकीशोर मोदी म्हणाले. राजकिशोर मोदी यांनी बँकेविषयी केलेल्या मागणीवर गांभीर्याने विचार करू तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (शिखर बँक) अधिकारी या बँकेत पाठवून बँकेस आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करू असा सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले.

### राज्याच्या गृहराज्यमंत्र्याचा...

आहे यांची प्रचिती काल गृहराज्य मंत्री योगेश कदम यांनी अनुभवली आहे. मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी देऊन त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा हीच अपेक्षा संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला आहे. परंतु या महायुती सरकार ने गुन्हेगार पोसले आहेत. न्यायाची अपेक्षा कोणाकडून ठेवायची हाच गहन प्रश्न असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम सांगितले.

### शिक्षण विभागाचा...

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी करत शासनाच्या तुघलकी कारभाराचा निषेध केला आहे.

ग्रामीण भागातील सायकल वर शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय? उष्माघाताची जबाबदारी कोण घेणार?? ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी आजही पायी, सायकल किंवा तासन तास एसटीची वाट पहात उभे असतात.अशा विद्यार्थ्यांना उष्माघाताचा त्रास झाला तर त्याची जबाबदारी शाळा किंवा शिक्षण विभाग घेणार आहे का?? असा प्रश्न पालकांनी उपस्थित केला आहे.

म्हणे वर्गखोल्या थंड ठेवा ?? बीड जिल्ह्यातील १३९२ शाळांमध्ये वीजपुरवठाच नाही :-डॉ.गणेश ढवळे उष्माघाताचा प्रभाव टाळण्यासाठी वर्गखोल्या थंड ठेवण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २४८० शाळांपैकी ७७२ शाळांना वीज पुरवठाच करण्यात आलेला नाही. तर ६२० शाळांमधील वीजपुरवठा महावितरण कर्मचाऱ्यांनी वीज देयके थकीत असल्याने वीज पुरवठा खंडित करून मीटर काढून नेले आहे. तब्बल १३९२ शाळांमधील विद्यार्थ्यांचे कॉम्प्युटर स्मार्ट टीव्ही डिजिटल बोर्ड एलईडी आधी उपकरण व साहित्य धुळकात पडत असून एखादी विद्यार्थ्यांचे डिजिटल अंधारात आहे.वर्गखोल्या थंड करण्यासाठी कुलर लावावे लागतील आणि वीजपुरवठाच नाही,साधे पंखे नाहीत तर वर्गखोल्या थंड ठेवणार कशा?? एसी केबिनमध्ये आणून एसी गाड्या मधुन फिरणाऱ्या आधिका-यांना उन्हाची तिव्रता काय समजणार असा प्रश्न डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जगद्गुरू तुकोबारायांच्या अंभंगांनी दुमदुमला आनंदडोह

## शेकडो नागरिकांच्या सहभागाने 'गाथा पुनरुत्थान दिन' साजरा







**पुणे । प्रतिनिधी**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांची गाथा सनातन्यांनी १७ व्या शतकात देहू येथील इंद्रायणी नदीच्या डोहात बुडवल्यानंतर ती १३ दिवसांनी पुन्हा तरली अर्थात त्यांचे अभंग पुन्हा प्राप्त झाले, तो दिवस म्हणजे 'गाथा पुनरुत्थान दिन.' हा दिवस साजरा करण्यासाठी नुकतेच शेकडो नागरिक इंद्रायणीच्या त्याच डोहाजवळ जमले आणि त्यांनी तुकोबारायांच्या अभंगांचे सामूहिक गायन केले. त्यात गावोगावांहून आलेल्या सर्वसामान्य नागरिकांसह वारकरी, विद्यार्थी, अध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश होता.

तुकाराम महाराजांची गाथा तरली ती तिथी चैत्र शुद्ध तृतियेची असल्याचे अभ्यासकांनी शोधून काढले आहे. त्यामुळे त्या दिवशी येणाऱ्या दिवशी 'गाथा परिवार' या संस्थेतर्फे हा आनंदाचा दिवस 'गाथा पुनरुत्थान दिन' साजरा केला जातो. या वर्षी हा दिवस गेल्या सोमवारी साजरा करण्यात आला. त्यासाठी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमधून तुकाराम महाराजांना मानणारे शेकडो भाविक, वारकरी देहू येथे जमा झाले होते. त्याबरोबर देहू येथील स्थानिक नागरिक, शिक्षक-विद्यार्थी, वारकरी प्रशिक्षण शाळांचे विद्यार्थी हेही सहभागी झाले होते.

यानिमित्त सकाळी देहू येथील मुख्य मंदिरापासून ते आनंद डोहापर्यंत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे गायन करत पायी दिंडी काढण्यात आली. त्याचे उद्घाटन देहूचे माजी सरपंच श्री. मधुकर कंद यांच्या हस्ते झाले. 'गाथा परिवार'चे अध्यक्ष ह.भ.प. श्री. उल्हास महाराज पाटील या वेळी उपस्थित होते. ही दिंडी आनंद डोहाजवळ (जिथे तुकारम महाराजांची गाथ तरली तो डोह) पोहोचल्यानंतर सर्वांनी इंद्रायणीच्या नदीत व घाटावर उभे राहून सामुहिकरित्या अभंगांचे वाचन केले. सकाळच्या वेळी तुकोबांचे अभंगांचे स्वर वातावरणात पसरले, तेव्हा संपूर्ण वातावरण भारावून गेले. अभंगांचे गायन होत असताना जणू ४०० वर्षांपूर्वीच्या तुकोबारायांच्या काळात गेल्याची अनुभूती अनेक अबाल-वृद्धांनी घेतली.

या अभंग गायनानंतर प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. त्यात पंढरपूर येथील ह.भ.प. श्री. भारत महाराज जाधव यांचे मुख्य प्रवचन झाले. ते म्हणाले, 'अनेक सत्पुरुषांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केली, त्यांना धर्ममार्तडांनी त्रास दिला. मात्र, तिकाराम महाराजांचे अभंग त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची हिंमत देतात. त्यामुळेच त्यांचे अभंग पुन्हा मिळाले तेव्हा केवळ त्यांची गाथा तरली नाही, तर अवघे विश्वच तरले.' अध्यक्षस्थानावरून बोलताना ह.भ.प. उल्हासमहाराज पाटील म्हणाले, 'तुकाराम महाराज हे क्रांतिकारक संत होते. त्यांनी अभंगांमधून नेहमीच समाजातील कु-प्रवृत्तींवर आघात केला. म्हणूनच तत्कालीन धर्मसत्तेने त्यांच्यावर खटला दाखल करून त्यांचे अभंग असलेली गाथा बुडवण्यात आली. त्याच्याविरोधात तुकोबांनी धर्मसत्तेशी लढा दिला आणि इंद्रायणीच्या काठी १३ दिवस उपोषण केले. हे उपोषण म्हणजे 'अभिव्यक्तीचा अधिकारा'साठी दिलेला लढाच होता. त्यामुळे आजच्या काळातही तुकोराम महाराज, त्यांनी दिलेला लढा आणि त्यांचे अभंग महत्त्वाचे ठरतात.'

या कार्यक्रमाला देहूचे माजी सरपंच मधुकर कंद, ह.भ.प. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, राष्ट्र सेवा दलाचे अर्जुन कोकाटे, डॉ. चंद्रकांत कोलते, किशोर ढमाले, प्रतिमा परदेशी, अभिजित घोरपडे, रवीतात्या कंद, आदी. उपस्थित होते. त्यानंतर तुकोबांच्या भजनांचे गायन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. देहू आण जुन्नर येथील श्री. रामकृष्ण अय्यर व सहकारी तसेच, डॉ. ज्ञानेश्वर गुळिग आणि इतरांनी सुस्वर अभंग गायले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शब्दावर आंदोलन मागे !

## निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही- रोहन गलांडे पाटील

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ आशोक थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे या मागणीसाठी ५ एप्रिल रोजी अत्मदहनाच्या इशाऱ्यांचे आंदोलन रोहन गलांडे यांनी २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे कारण सरकार निलंबन मागे घेण्यासाठी वेळ मागु करत आहे तसेच उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी २ एप्रिल रोजी सभेत बोलताना म्हटले की निलंबन मागे घेण्यात येईल त्यामुळे रोहन गलांडे पाटील यांनी ५ एप्रिल रोजीचा अत्मदहनाचे आंदोलन स्थगित करत केला आहे परंतु येणाऱ्या २६ एप्रिल पर्यंत निलंबन मागे घेतले नाही तर २६ एप्रिल रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह चिंचोली माळी येथे अत्मदहन करणार आहे असे सरकारला कळविण्यात येते तरी २६ एप्रिल रोजी माझे काही बरे वाईट झाले तर सरकार, प्रशासन जबाबदार राहील असे निवेदन रात्री १२ वाजता केज तहसीलदार, पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहे असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी काल रात्री १२ वाजता पोलीस प्रशासन चिंचोली माळी येथे रोहन गलांडे पाटील यांच्या घरी आले असता त्यांनी पोलिस प्रशासनाला व केज तहसीलदार यांना निवेद्वारे म्हटले आहे तरी डॉ आशोक थोरात यांचे निलंबन २६ एप्रिल पर्यंत स्थगित केले आहे परंतु निलंबन मागे घेतले जात नाही तोपर्यंत मागे हटणार नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# राधाकृष्णनगरीमध्ये हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

## रविवारी महामंडलेश्वर त्रिविक्रमानंद सरस्वती यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील पांगरी रोड भागातील राधाकृष्ण नगरीमध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हनुमानजी जन्मोत्सव रविवार दिनांक ०६ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात विविध नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहातील दैनिक कार्यक्रम, भजन, संप्रदाय कीर्तन, महाप्रसाद व हरिजागर कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. वेदमूर्ती ह.भ.प. अविनाश देवा ठोसर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या सप्ताहात दररोज सकाळी ७.०० ते १०.०० ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ६.०० ते ७.०० हरिपाठ, रात्री ७.३० ते ९.३० सांप्रदायिक कीर्तन, ९.३० ते १०.३० महाप्रसाद व त्यानंतर हरिजागर होणार आहे. रविवार दि. ६ एप्रिल १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज यांचे कीर्तन, दि. सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी गणेश महाराज पिंपळे बीड, मंगळवार दि.०८ एप्रिल रोजी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे, बुधवार दि. ९ एप्रिल रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर सर, गुरुवार दि. श्रीमती प्रतिमाताई गायकवाड यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.



*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुख्य प्रदोत, मुंबई चे माजी महापौर सुनिलजी प्रभु यांची जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भेट घेऊन बीड जिल्हाप्रमुख पदी निवड केल्याबद्दल आभार मानले. यावेळी बीड चे संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, नवनाथ प्रभाळे, सतीशसिह परदेशीं सह आदी..*

# जलजीवन योजनेच्या नावाखाली पालसिंगणकरांचे जणजीवन झाले विस्कळीत

**▸ योजनेच्या कामाचा दर्जा तपासावा. ग्रामस्थांची मागणी**

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील पालसिंगन येथे जलजीवन योजना मंजूर झाली त्याचे कामही झाले,दोन विहिरी बांधल्या,दोन पाण्याच्या टाक्या बांधल्या तरीही अद्याप जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा वणवन करावी लागते. आमदार संदीप भैय्या क्षीरसागर प्रचारसाठी गावात आले असता त्यांनी या योजनेचे ठेकेदार चव्हाण यांना कामाची चौकशी केली असता त्यांनी ३.४दिवसात करतो म्हणून सांगूतले होते पण आता ४महिने उलटून गेले तरी पाणी काही गावात आले नाही. ते का आले नाही त्यात समंधित लोकांना च कामाच्या दर्जाबदल शंका आहे की काय अशी चर्चा आहे म्हणून पुढे काही होत नाही अशी चर्चा आहे.

म्हणून समंधित कामाचा दर्जा तपासून योजना लवकर चालू करावी अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे. अन्यथा उपोषणास बसण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अशोक जगताप यानी दिला आहे .

# बनावट कागद पत्रा आधारे अपहार केल्याच्या आरोपातून रामा धनवडे व अंसा बाई यांना जामीन मंजूर: ॲड योगेश टेकाडे

**बीड । प्रतिनिधी**



घटनेची हकीकत अशी की, मी बंकट पि. श्रीराम शिंदे, वय-३० वर्षे, धंदा-शेती, रा. कोळवाडी ता.जि.बीड यांनी फिर्याद दिली की, आमची मौजे पाली ता. जि.बीड येथे गट नं. ७४७ मौजे पाली ता.जि.बीड येथे जमीन आहे. सदर गटातुन ०.०६ आर जमीन शासनाने राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठी संपादीत केली आहे, त्याचा मावेजा शासनाने रु.१९,६२,०००/ (एकोणीस लाख बासष्ठ हजार रुपये) मंजुर केला आहे. सदर पूर्ण गटाची मालकी माझी आजी आसराबाई भ्र. लिंबाजी शिंदे हिची आहे. आम्ही सर्वजण कोळवाडी येथे राहायला आहोत, असे असतांना संपादनाचे वेळी पाली ता. जि.बीड येथील रामा लक्ष्मण धनवडे यांच्या मनात या मावेजा बाबत लालच निर्माण झाल्यामुळे या पूर्ण गटाची मालकी आणि ताबा माझी आजी आसराबाई लिंबाजी शिंदे हिची असतांना रामा धनवडे यांनी या गटाचा ताबा आनसाबाई लक्ष्मण धनवडे हिचा आहे असे खोटे सांगुन मोजणी वेळी तिचे नावाचा ताबा दर्शवला. सदरील तक्रारी मुळे आरोपी च्या विरोधात केस दाखल झाली.आरोपीचे वकील ॲड योगेश टेकाडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी राम धनवडे व अंसाबाई धनवडे यांना भारतीय दंड संहिता चे कलम ४२०,४६७,४६८,४६९ या गुन्ह्यातून जामीन मंजूर करण्यात आला.

# पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथील समाजभूषण युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दर वर्षी प्रमाणे याही वर्षी वडवणी येथील दीपस्तंभ गुरुकुल वडवणी व बीड येथील जिव्हाळा अनाथ आश्रम येथे खाऊ वाटप व गुरुकुल च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप व खाऊ वाटप करण्यात आले आहे.



दिवसेंदिवस वाढदिवस. करण्याच्या पद्धती आपण बदलताना पाहत आहोत परंतु ह्या गोष्टींना बाजूला ठेवून युवा पत्रकार अंकुश गवळी व लहु गवळी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय साहित्य वाटप केले.. असे नवीन उपक्रम युवकांनी राबवले पहिजे असे प्रतिपादन ज्ञान संस्कार गुरुकुल चे संचालक ईतापुरे सर यांनी केले आहे. उपक्रम राबवणाऱ्या युवकाला परिसरातील माणसांनी जपले पाहिजे. यावेळी कार्यक्रम ला दीपस्तंभ गुरुकुल संचालक सुसेन मुंडे सर. व ईतापुरे सर.उद्योजक शहाजी बप्पा लोकरे. मुंडे सर. बळीराम गवळी. दत्ता गवळी. करण लोकरे. ईत्यादी उपस्थित होते. वाढदिवसा निमित्त संपूर्ण राज्यभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.राजकीय नेते, अभिनेते,सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर,पत्रकार, वकील,व्यापारी तसेच त्यांच्या मित्र परिवाराने त्यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या.पत्रकार अंकुश गवळी यांनी पत्रकारितेत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या निर्भीड आहेत. सत्य आणि न्यायाच्या मार्गावर चालत त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यांच्या वाढदिवसा निमित्त राज्यभरातून शुभेच्छा संदेश,फोन कॉल आणि सोशल मीडियावर पोस्टच्या माध्यमातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक मान्यवरांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी त्यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. तसेच, सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनीही त्यांना शुभेच्छा दिल्या. पत्रकारिता क्षेत्रातील सहकारी आणि हितचिंतकांनी देखील त्यांना गवळी अंकुश गवळी लहु यांच्या वाढदिवसा निमित्त विविध ठिकाणी सत्कार समारंभ व सामाजिक उपक्रम साजरा करण्यात आला आहे भावना व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
रविवार, दि.०६ एप्रिल २०२५ पान ४



*धारूर: तांदळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने शनिवारी सांगता झाली यावेळी साखरे कुटुंबीयांनी सात दिवस जीवाचे रान करून वारकऱ्यांची सेवा केली या वेळी सुभाष साखरे यांच्या कुटुंबियांचा गावकऱ्यांच्या व महाराजांच्या वतीने श्रीफळ नारळ देऊन सत्कार करण्यात आला.*

# प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सायबर डेस्क

## सायबर फसवणुकी विरोधात बीड पोलिसांचे प्रभावी पाऊल




**बीड । प्रतिनिधी**

जगभरातील डिजिटायझेशनमुळे नागरिकांचे आयुष्य सुलभ झाले असले, तरी सायबर फसवणुकीचे प्रमाणही झपाट्याने वाढत आहे. आर्थिक फसवणूक, ओळख चोरी, मोबाईल चोरी, हॅकिंग, सायबर स्टॉकिंग आणि हानिकारक सॉफ्टवेअर यांसारख्या गुन्ह्यांना अनेक नागरिक बळी पडत आहेत.

नागरिकांचे आर्थिक व्यवहार, सामाजिक संवाद आणि व्यवसाय डिजिटल होत असताना, सायबर गुन्हेगारांनी गाफील नागरिकांना लक्ष्य करणे सुरूच ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांना सायबर फसवणुकीपासून जागरूक करणे आणि अशा प्रकारांमध्ये मदत करण्याच्या हेतूने पोलीस विभागाने मोठे पाऊल उचलले आहे.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात 'सायबर डेस्क' ची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक सायबर डेस्कवर एक अधिकारी आणि दोन अंमलदार नियुक्त करण्यात आले असून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे मोबाईल हरवणे, सायबर फसवणूक यांसारख्या घटनांवर वेळीच आणि प्रभावी उपाययोजना करता येणार आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता जवळच्या पोलीस ठाण्यातील सायबर डेस्कशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केली आहे.



*बीड: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजितदादा पवार यांच्या गटात प्रवेश केल्याबद्दल शेख निजाम यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला.*

# बीड जिल्हा बँकेचे पालकत्व पुणे जिल्हा बँकेने स्विकारावे

## राजकिशोर मोदी यांचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्याकडे मागणीपर निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वीकारावे अशा प्रकारची मागणी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा अंबाजोगाई नगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी एका निवेदनाद्वारे अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके हे होते.



मागील काही वर्षांपासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईला आली आहे. त्यामुळे बँकेचे ग्राहक आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. बँक आर्थिक डबघाईतून बाहेर काढून शेतकऱ्यासह अन्य ग्राहकांना त्याचा लाभ होण्यासाठी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्विकारावे, अशी मागणी राजकिशोर मोदी यांनी अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. बीड जिल्हा दौऱ्यावर असलेल्या अजितदादा पवार यांना मोदी यांनी जिल्हा बँकेच्या आर्थिक परिस्थिती बाबत अवगत केले. त्या बँकेमुळे जिल्ह्यातील हजारो ग्राहक आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. कित्येक ग्राहकांनी या आर्थिक विवंचनेतून आत्महत्या देखील केल्याचे मोदी यांनी अजितदादा यांना अवगत केले.

गेली काही काळापासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक परिस्थिती मुळे बँकेचे ठेवीदार, शेतकरी, छोटे व्यापारी, नोकरदार, निवृत्त कर्मचाऱ्यांचे कोट्यावधी रुपये या ▶▶ उर्वरित पान २ वर

# श्रीराम जन्मोत्सव सर्व भाविक भक्तांनी मोठ्या उत्साहात साजरा करावा: नवनाथ अण्णा शिराळे

**बीड । प्रतिनिधी**





श्रीराम जन्मोत्सव सर्व श्रीराम भक्तांनी मोठ्या आनंदात आणि मोठ्या उत्साहात साजरा करावा आणि श्री कंकालेश्वर मंदिर या ठिकाणावरून श्री प्रभू चंद्राची विधीवत महापूजा संपन्न झाल्यानंतर बीड शहरातून सर्वत्र श्री प्रभू रामचंद्राची मिरवणूक काढण्यात येणार आहे या मिरवणुकीमध्ये सर्व भाविक भक्तांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहून हा जन्मोत्सव साजरा करावा आणि कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी आणि कोणाच्याही अंगावर गुलाल वगैरे टाकू नये सर्वांनी शिस्तीमध्ये श्रीराम चंद्र प्रभूची ची मिरवणूक साजरी करावी ही मिरवणूक बीड येथील प्रसिद्ध असलेले श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिर येथून चार वाजता निघून सुभाष रोड वरून माळवेस मंदिराच्या ठिकाणावरून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकांमध्ये जाऊन श्रीराम जन्म ोत्सव मिरवणुकीची त्या ठिकाणी सांगता होईल असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन होय : डॉ. के. डी. सावंत

**नेकनूर । प्रतिनिधी**

येथील प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात इतिहास विभागाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक योगदान या विषयावर दि. ४ एप्रिल , २०२५ रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जयभवानी महिला महाविद्यालय , गेवराई येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. के. डी. सावंत हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील आयक्यूएसी समन्वयक डॉ. मकबूल सलीम हे उपस्थित होते.



*पुणे : पिंपरी चिंचवड शहराचे चिंचवड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मा.श्री. शंकरभाऊ जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना उद्योजक बाळासाहेब काळे पीसीएमसीसी कॉन्ट्रॅक्टर भास्करजी थोरे युवा उद्योजक आनंदी देवडकर व काळेवाडी मंडळाचे माजी सरचिटणीस दीपक जाधव आदी उपस्थित होते.*

# ज्योत्सना मॅडमच्या मग्रुरी विरोधात पत्रकार संतोष रासवे कारणार डफली बजाव आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाच्या गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक या झोपेचे सोंग घेऊन बसले आहेत त्यांना जाग करण्यासाठी पत्रकार संतोष रासवे यांनी डफली बजाव आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे माजलगाव तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना असेल किंवा रमाई घरकुल योजना असेल सदर घरकुल योजनेत लाभार्थ्यांची सरासपणे लूट चालवली आहे तुम्ही घर बांधता किंवा नाही बांधता मला याच्याशी काही देणंघेणं नाही मला माझी रक्कम द्या आणि तुमचा हप्ता घेऊन जा असा उचांद मांडलेल्या कॉन्ट्रॅक्ट बेस वरील इंजिनियर ला आवरा यासाठी माजलगाव गटविकास अधिकारी ज्योत्स्ना मुळीक यांना अनेक वेळा तोंडी सूचना दिल्या वृत्तपत्रातून बातम्या छापून आणल्या मात्र झोपेतच सोंग घेऊन बसलेल्या ज्योत्स्ना मॅडमला जाग येत नाही म्हणून शेवटी पत्रकार संतोष रासवे यांनी जोत्सना मॅडम यांना जागे करण्यासाठी डफली बजाव आंदोलन करणार असल्याचे तोंडी सांगितले आहे या वर ही मॅडम जाग्या झाल्या नाहीआम्ही ग्रामीण पत्रकार जनतेचे शेवक या नात्याने शेवटचं अस्त्र म्हणून पँच क्रोशीतील घरकुल लाभार्थी यांना एकत्र करून पंचायत समितीवर हल्ला बोल आंदोलन करू असे शेवटी पत्रकार संतोष रासवे यांनी सांगितले

# राज्याच्या गृहराज्यमंत्र्याचा मोबाईल मिसिंग की बीडच्या गुन्हेगारांनी मंत्र्याला ट्रायल दाखवली

## सामान्य जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडे करायची: उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्रराज्यचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा काल मोबाईल गहाळ झाल्याची माहिती आज मिळाली. मोबाईल गहाळ झाला की योगेश कदम यांना बीडच्यागुन्हेगारांनी ट्रायल दाखवली, समोर मीडिया उपस्थित असतांना मोबाईल गहाळ होतो, केज पोलीस स्टेशनला तशी मिसिंग तक्रार संबंधित मंत्र्याने दिली आहे असे समझले. जर राज्याचा गृहराज्य मंत्रीही बीड मध्ये असुरक्षित असेल तर जिल्ह्यातील जनतेने न्यायाची अपेक्षा कोणाकडे करायची, असा उपरोधीक टोला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी गृहराज्यमंत्र्याला लागवाला आहे. बीड मध्ये किती गुन्हेगारीता वाढली ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: स्वराज्यनगर येथील श्रीकृष्ण मंदिर येथील श्री राम नवमी निम्मित शनिवारी बीड शहरामध्ये रथ यात्रा मिरवणूक काढण्यात आली या वेळी प्रभुजीचे भक्त, भाजपाचे नेते नवनाथ आण्णा शिराळे, अशोक लोढा, डॉ. प्रविण ढगे आदी भक्तगण छायाचित्रात दिसत आहेत.*

# शिक्षण विभागाचा तुघलकी कारभार ; अंगाची लाही होणा-या कडक उन्हाळ्यात परीक्षा

## दुसरीकडे पोषण आहाराची भ्रांत आणि म्हणे थंड पेय द्या : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**





पहिली ते नववीच्या परीक्षा पद्धतीत एकवाक्यता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषदेचे संचालक राहुल रेखावर यांनी भर उन्हाळ्यात परीक्षा घेण्याचा घाट घातला असून राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या परीक्षा ०८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत घेण्यात याव्यात असे परिपत्रक काढण्यात आले आहे. केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या पत्राचा संदर्भ देत महसूल मंत्रालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने काढलेल्या आदेशानुसार उष्माघाताचा प्रभाव कमी करण्यासाठी वर्गखोल्या थंड असाव्यात तसेच शालेय पोषण आहार अंतर्गत सरबत, ताक ,ओआरएस पॅकेट आदि शितपेये देण्यात यावे.असे आदेश काढण्यात आले आहेत. एकीकडे वेळेवर अनुदान न मिळणा-या पोषण आहाराचीच भ्रांत असणाऱ्या मुख्याध्यापक शिक्षकांनी व्यवस्था करायची कुठुन असा प्रश्न पडला आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यातील १४२० शाळांमध्ये वीजपुरवठाच नाही तर काही शाळांमध्ये पंखे नाहीत त्यामुळे वर्गखोल्या थंड ठेवण्यासाठी कुलर कुठुन आणायचे आणि जिल्हा परिषदेच्या ३१७ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याचा व स्वच्छतागृहांचा अभाव असताना शितपेये कुठुन देणार असा सवाल ▶▶ उर्वरित पान २ वर

